**दिनांक १३/०१/२०१० रोजी मा. श्री. गुलाबराव खरात, प्र. उपजिल्हाधिकारी अहमदनगर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीच्या सभेचे इतिवृत्तांत.**

| अक्र/ विषय क्र. | विषय | विषय सादर करणारी संघटना कार्यालय | कार्य वाहीशी संबंधी त कार्यालय | कार्यवाही / निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे .. | जि.उ.कें.अ.नगर | - | मा. जिल्हाधिकारी अतिमहत्वाच्या इतर कामात व्यस्त असल्याने मा. श्री.गुलाबराव खरात, प्र.उप जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली. सर्व सदस्यांचे वतीने मागील सभेचे इतिवृत्त सर्व सदस्यांना वाटप करण्यात आलेले असून त्या बाबत कोणाचे काहीही म्हणणे नसल्याने त्यास सभेत मान्यता देण्यात आली. |
| २ | मे.सनफार्माजवळ वाहने उभि असलेमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो | मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रिज अँड ॲग्रीकल्चर अहमदनगर | महा नगर पालिका, अहमदनगर | श्री.आर.एस.कुलकर्णी, उप अभियंता, एमआयडीसी यांनी सदर विषयी दि.८.१.२००० रोजी सभा घेऊन सर्व संबंधित अधिका-यांच्यावतीने वाहने उभी करण्याची जागा निश्चित केल्याचे सांगुन या जागेवर पुढील ८ ते १० दिवसात वाहने उभी करण्याचे बोर्ड लावण्यात येतील असे सभागृहात स्पष्ट केले. याबाबत महानगरपालिकेचा सहभाग असतांना संबंधित अधिकारी उपस्थित नसल्याने मा.अध्यक्षांनी नाराजी व्यक्त करुन याबाबत नगरपालिकेला पत्राने उपस्थित नसल्याबाबतचा खुलासा मागवावा असे आदेश दिले. याचप्रमाणे मा.पोलीस निरीक्षक वाहतुक शाखा यांनी लक्ष देऊन वाहने ही ठरविण्यात आलेल्या जागेवर नियमितपणे उभी राहतील याकडे लक्ष देऊन पुढील योग्य ती कार्यवाही करावी. (कार्यवाही :- मऔविम, कामे, पोलीस निरीक्षक ट्रफीक खाते व महानगरपालिका) |
| ३ | महा.नॉनबायोडिग्रेडिबल गार्बेज नियंत्रण अध्यादेश २००६ व क्ष्याअंतर्गत महा. प्लास्टीं कपिशव्यांचे (कॅरीबॅग्ज) (उत्पादन व वापर) नियम २००६ व महा. अविघटनशिल धनकचरा नियम २००६ बाबत | जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर | मऔ विम | सदरचा मुद्या हा क्षेत्र व्यवस्थापक यांच्या कक्षेत येत असल्याचे उप अभियंता कामे एमआयडीसी यांनी सभेत स्पष्ट केले. त्याअनुषंगाने क्षेत्र व्यवस्थापक यांनी सभेत सांगितले की, घनकचरा साठविण्या करीता तात्पुरत्या स्वरुपात जागेची व्यवस्था करण्यात आली असून |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | याठिकाणी उद्योजकांना घनकचरा टाकणे बाबत तसे कळविण्यात येईल. सदरचा मुद्दा गेल्या चार पांच सभांमध्ये चर्चेला येत असून याबाबत क्षेत्र व्यवस्थापक यांनी नेमकी काय कार्यवाही केली याचा खुलासा जिउकेला कळवावा व विषय पुढील सभेत चर्चेला येणार नाही याची दक्षता घ्यावी. (कार्यवाही :- क्षेत्र व्यवस्थापक मऔविम) |
| ४ | श्रीरामपूर मऔविमं क्षैत्रासाठी मोठया प्रमाणावर कायम स्वरुपी पाणी पुरवठयाची सोय होणे बाबत. | श्रीरामपूर एम आय डी सी असोशिएशन | मऔविमं | सदर विषयी निवेदाही दि.१४.१२.२००९ रोजी मुख्य कार्यकारी अभियंता, एमआयडीसी पुणे यांना पाठविल्याचे उप अभियंता कामे यांनी सभेत सांगितले की, श्रीरामपुर एमआयडीसी क्षेत्रास लागू नसलेल्या कालव्या मधुन पाणी देणार असल्याचे स्पष्ट करुन सदरचा प्रस्तावास १० कोटी खर्च अपेक्षित असून खर्चाचा प्रस्ताव उप अभियंता एमआयडीसी पुणे यांचे मार्फत मंत्रालयात वरिष्ठ पातळीवर पाठविण्यात आलेला आहे. याबाबत मा.आमदार श्री.नरेंद्र घुले पाटील यांनी सदरच्या प्रस्तावाची प्रत पुणे कार्यालयाकडुन मागवून घेऊन त्यांना सादर करावी म्हणजे याबाबत वरिष्ठ पातळीवर त्यांचेद्वारे चर्चा घडवुन आणुन प्रश्न मार्गी लावण्याचे प्रयत्न केले जातील असे मा. आमदार यांनी उप अभियंता कामे एमआयडीसी यांना सुचना केल्या. (कार्यवाही :- उप अभियंता मऔविम) |
| | | | | सदरचा मुद्दा हा क्षेत्रिय व्यवस्थापक मऔविम यांचेकडील असून याबाबत दि.१७.११.२००९ रोजी संपन्न झालेल्या सभेत मा.अध्यक्षांनी दिलेल्या सुचने नुसार जिल्हयातील संबंधीत आमदाराशी संपर्क साधुन त्यांना विश्वासात घेऊन मऔविम क्षेत्रासाठी अतिरिक्त जमिन संपादनाचा प्रस्ताव तयार करावा उद्योजकांची जागेबाबतची मागणी लक्षात घेऊन यात खाजगी मालकाची किती एकर जागा आहे त्याचे गट नंबर व क्षेत्र किती आहे इत्यादी सविस्तर माहिती गोळा करुन सभागृहास सादर करणेबाबत आदेश देण्यात आले होते पंरतु क्षेत्रीय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | व्यवस्थापक यांनी सदरची माहिती आजतागायत सभागृहास दिलेली नाही. सदरचा विषय गेल्या चार पांच सभेत सारखा चर्चेला येत असून याबाबत क्षेत्रिय व्यवस्थापक यांनी ठोस कार्यवाही करणे अपेक्षित असून याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अंतिम अहवाल जिल्हा उद्योग केंद्राकडे न चुकता सादर करावा व सदरचा विषय पुढील सभेत परत चर्चेला येणार नाही याची प्राधान्याने दक्षता घ्यावी. (कार्यवाही :-क्षेत्रिय व्यवस्थापक) |
| ५ | कामगारांना वाहुन नेणा-या मिनी डोअर वाहनासाठी विनंती थांब्यांची जागा निश्चित होणे. | मराठा चेंबर | मनपा | याबाबत जागतिक बँकेने खुलासा केला की, मिनीडोअर वाहनांसाठी विनंती थाब्याची जागा उपलब्ध नसल्याने याबाबत महानगरपालिकेकडे विषय देण्यात येऊन त्यांचेकडुन जागा उपलब्ध करुन घ्यावी असे उपअभियंता कामे यांना कळविल्याचे सभेत सांगितले. यावर सभेत चर्चा होऊन महानगरपालिकेने जागा उपलब्ध करुन दिल्यास १० रिक्षांकरीता विनंती थांबा करता येऊ शकेल यावर महानगरपालिकेने पुढील योग्य ती कार्यवाही करुन पुढील सभेत अहवाल सादर करावा असे अध्यक्षांनी सुचविले. (कार्यवाही :- महानगरपालिका) |
| ६ | कोपरगांव सऔव नविन जागा मिळणे बाबत. | सऔव कोपरगांव | महसूल विभाग | कोपरगांव सहकारी औद्योगिक वसाहत लि. कोपरगांव यांनी त्यांचेकडील पुरग्रस्त जागे संबंधीचे प्रश्न सभेत मांडण्याबाबत तसे जिउके ला कळविले नुसार संबंधीत प्रश्न हे सभेत चर्चेस्तव मा.अध्यक्ष यांच्या पुढे आले असता कोपरगांव सहकारी औद्योगिक वसाहत लि. कोपरगांव यांचे कडील एकही व्यक्ती हजर नसल्यामुळे मा.अध्यक्षांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करुन याबाबत औद्योगिक वसाहतीला पत्र देऊन खुलासा मागविण्यात यावा अश्या सुचना मा.अध्यक्षांनी दिल्या. (कार्यवाही :- जिउके) |
| ७ | जिल्हा उद्योग केंद्र येथे सेतू कार्यान्वित करणे बाबत | म.व्य. जि.उ.कें. अ.नगर | - | सेतू सुरु करण्याच्या पुर्व तयारीचा भाग म्हणुन अस्मिता संघटनेने तयार केलेले सॉफ्टवेअरचे सादरीकरण संगणकाच्या सहाय्याने सर्वांना दि. १७.११.२००९ चे सभेत प्रात्यक्षिक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | दाखविण्यात आले होते. यावर मा. अध्यक्षांनी त्यातील आवश्यक असणा-या व आपोआप तयार होणा-या सुविधा उदा. अर्जाची पावती, संबंधीत खात्यास कळविणे, बाबतची कागदपत्रांची सूचि, योजनेचे फॉर्मस वगैरे बाबत सॉफ्टवेअरमध्ये समावेश करण्याचे सूचित केले होते व अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधल्यास मदत करता येईल असे स्पष्ट केले होते. तसेच सेतु जिउके अहमदनगर येथे लवकरात लवकर सुरु करण्याचे निर्देश दिले होते परंतु आजअखेर अस्मिता संघटनेकडुन याबाबत कुठलीही प्रगती झालेली नाही. तरी याबाबत अस्मिता संघटनेने त्वरीत लक्ष घालुन सेंतुचे कामकाज येत्या आठ दहा दिवसात सुरु करुन सेतु कार्यान्वित करावा अश्या सुचना अध्यक्षांनी अस्मिता संधटनेला केल्या **(कार्यवाहीः अस्मिता संघटना)** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | श्रीरामपूर न.पा.कडुन सऔव यांना मुलभूत सुविधा पुरविल्या जात नाहीत | श्रीरामपूर न.पा.कडुन सऔव | न.पा.श्रीरामपूर | श्रीरामपुर नगरपालिका श्रीरामपुर यांचेकडुन श्रीरामपूर औद्योगिक वसाहतीला मुलभुत सुविधा पुरविल्या जात नाही. हा मुद्या व्यवस्थापक औद्योगिक वसाहत श्रीरामपुर यांनी सभेत उपस्थित केला असता प्र.महाव्यवस्थापक यांनी सभेत सांगितले की, मुख्य कार्यकारी अधिकारी नगरपालिका श्रीरामपूर यांनी दि.२९.१२.२००९ च्या पत्राने इकडे कळविले आहे की, औद्योगिक वसाहतीचे मंजुर ले आऊट मधील अंतर्गत रस्ते व ओपन स्पेस यावर औद्योगिक वसाहतीमध्ये युनिट धारकांनी अतिक्रमन करुन अनाधिकृत बांधकाम केले असल्याने ते औद्योगिक वसाहतीने त्वरीत काढुन घेऊन वसाहतीमधील रस्ते नगरपालिकेकडे हस्तांतरीत करावे म्हणजे मुलभुत सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने नगरपालिकेला पुढील योग्य ती कार्यवाही करता येईल यावर मा. अध्यक्षांनी सुचना केल्या की, औद्योगिक वसाहतीने अतिक्रमण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | काढण्याची कार्यवाही पुर्ण करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील सभेत सादर करावा. ( कार्यवाही :- मा.चेअरमन, सहाकारी औद्योगिक वसाहत लि,श्रीरामपुर) |
| ९ | अ.नगर मऔविमं मध्ये पाण्याचे दर व सेवादर आकारणी ही डी-झोन प्रमाणे करणे बाबत | मे. प्रशंशा इंडस्ट्रीज | मऔविमं | उपअभियंता देखभाल उपविभाग मऔविम यांनी सभेत खुलासा केला की, याबाबतचा अहवाल विभागीय कार्यालय पुणे मऔविम यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे. यावर मा.अध्यक्षांनी सुचना केल्या की याबाबत उप अभियंता देखभाल मऔविम यांनी विभागीय कार्यालयाशी संपर्क साधुन उद्योजक व विभागीय कार्यालय यांची एक त्र सभा आयोजित करुन याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा. विभागीय कार्यालय पुणे हे नेहमीच जिल्हा उद्योग केंद्राच्या सभेस उपस्थित राहात नसल्यामुळे धोरणात्मक प्रश्नावर संबंधीतांना माहिती सांगता येत नाही फक्त प्रस्ताव वर पाठविला आहे असेच उत्तर त्यांचेकडुन नेहमी दिले जाते व त्यामुळे संबंधीत मुद्यावर कुठलाच निर्णय वेळेत होत नाही. त्यामुळे धोरणात्मक प्रश्ने तशीच प्रलंबीत राहातात व प्रत्येक सभेत परत परत तेच चर्चेला येतात. हे टाळण्यासाठी हे सभेत उपस्थित राहणे आवश्यक आहे. यावर मा.अध्यक्षांनी सुचना केल्या की संबंधीत अधिकारी हे उपस्थित नसल्यामुळे त्यांना पत्र देऊन त्यांचा खुलासा मागविण्यात यावा व पुढील सभेत तो सादर करावा. तसेच उप अभियंता देखभाल व मऔविम यांनी सदर मुद्याबाबत विभागीय कार्यालयाशी संपर्क साधुन याबाबतच्या प्रगतीचा सविस्तर अहवाल पुढील सभेत सादर करावा. ( कार्यवाही :- जिउके व उप अभियंता देखभाल व मऔविम) |
| १० | कोपरगांव सहकारी औद्योगिक वसाहतीच्या पब्लिक ॲमिनिटीच्या जागेत व ओपनस्पेसच्या जागेत असलेल्या योग्य ठिकाणी शिफ्टींग करणेबाबत | कोपरगांव औद्योगिक वसाहत कोपरगांव | म रा वि वि कं | सदरचा विषय सभेत चर्चेत आला असता अभियंता यांनी सभेत सांगितले की, औद्योगिक वसाहतीने दिलेले पत्र विचारात घेऊन कामाचे स्वरुपानुसार इस्टीमेट तयार करण्याच्या सुचना संबंधीतांना देण्यात येऊन तसे औद्योगिक वसाहतीला कळविण्यात येईल. ( कार्यवाही :- अभियंता |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | मराविविकं) |
| ११ | वसाहतीच्या क्षेत्रात रात्रीच्या वेळेस पोलीस गाडीचा राऊंड होणेबाबत. | कोपरगांव औद्योगिक वसाहत कोपरगांव | पोलीस अधिक्षक अहमदनगर | याबाबत पोलीस उप अधिक्षक, मुख्यालय अहमदनगर यांनी सभेत सांगितले की, कोपरगांव औद्योगिक वसाहतीच्या क्षेत्रात रात्रीच्या वेळेस पोलीस गाडीचा राऊंड होणेबाबत पोलीस निरीक्षक कोपरगांव पोलीस ठाणे यांना वसाहतीची पाहणी करुन सदर परिसरात रात्रपाळीसाठी पोलीस बंदोबस्त ठेवण्याच्या सुचना त्वरीत देण्यात येतील याकामी वसाहतीमध्ये नेमलेल्या पोलीस अंमलदार, बीट मार्शल व रात्रपाळी ग्रस्तीची वाहने ही ठेवण्यात येणा-या हजेरी पत्रकावर स्वाक्ष-या करतील व गुन्हयांची नोंद करतील अश्या प्रकारच्या सुचना संबंधीतांना देण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात येईल ( कार्यवाही :- पोलस उपअधिक्षक मुख्यालय, अहमदनगर) |

शेवटी मा.अध्यक्षांच्या अनुमतीने उपस्थितांचे आभार व्यक्त करुन सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

स्वाक्षरी/----
प्र.महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,
जिल्हा उद्योग मित्र समिती, अहमदनगर.

स्वाक्षरी/----
मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा उद्योग मित्र समिती, अहमदनगर.